17 MAR 2017 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दक्षिण कोरियातील विद्यापीठाशी सामंजस्य करार



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि दक्षिण कोरियातील म्यॉंगजी विद्यापीठ यांच्यातील सामंजस्य करारावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि प्रा. डॉ. जिऑंग गिल सिओ. यावेळी प्रा. डॉ. ए. व्ही. घुले, डॉ. डी. टी. शिर्के व डॉ. पी. एस पाटील आदी.**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ आणि दक्षिण कोरियातील म्यॉंगजी विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. शैक्षणिक तसेच संशोधन क्षेत्रातील संबंध अधिक बळकट करण्यासाठी तसेच दोन्ही विद्यापीठांनी परस्पर सहकार्य वाढविण्याबाबत हा करार करण्यात आला आहे. शिवाजी विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि म्यॉंगजी विद्यापीठाच्या वतीने प्रा. डॉ. जिऑंग गिल सिओ यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

शिवाजी विद्यापीठाच्या नॅनो-सायन्स आणि तंत्रज्ञान अधिविभागाच्या सभागृहात झालेल्या या समारंभास नॅनो-सायन्स व तंत्रज्ञान अधिविभाग समन्वयक प्रा. डॉ. पी. एस पाटील, संख्याशास्त्र अधिविभागाचे ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. डी. टी. शिर्के, आंतरराष्ट्रीय संबंध कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. ए. व्ही. घुले उपस्थित होते.

या करारात विद्यापीठातील



शिवाजी विद्यापीठातून...

विद्यार्थ्यांचे आदानप्रदान, संशोधन क्षेत्रात सहकार्य, तसेच वित्तीय साहाय्य या बाबींचा समावेश आहे. शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा दक्षिण कोरियामधील विविध शिक्षण संस्थांमधला सहभाग लक्षात घेता, येथे कोरियन भाषा केंद्र, तसेच म्यॉंगजी कोरियन विद्यापीठांत हिंदी भाषा केंद्र स्थापन करण्याची आवश्यकता डॉ. पाटील यांनी व्यक्त केली.

कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी डॉ. पाटील यांच्या प्रस्तावाचे स्वागत केले. तसेच या सामंजस्य करारामुळे दक्षिण कोरिया आणि शिवाजी विद्यापीठाचे संबंध आणखी दृढ होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

म्यॉंगजी विद्यापीठातील संशोधक डॉ. सिओ यांनी शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी दक्षिण कोरियात उत्तम संशोधकीय योगदान देत असून या कराराच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठाशी सहकार्यवृद्धी होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला. यावेळी नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागातील शिक्षक, संशोधक, विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. एस. डी. जगदाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. ए. पी. तिवारी यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAR 2017 पुण्यनगरी

# दक्षिण कोरिया म्यॉंगजी विद्यापीठाशी शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि दक्षिण कोरियातील म्यॉंगजी विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. शैक्षणिक तसेच संशोधन क्षेत्रातील संबंध अधिक बळकट करण्यासाठी तसेच दोन्ही विद्यापीठांनी परस्पर सहकार्य वाढवण्याबाबत हा करार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि म्यॉंगजी विद्यापीठाच्या वतीने प्रा. जिऑंग गिल सिओ यांनी स्वाक्षऱ्या केल्या. शिवाजी विद्यापीठाच्या नॅनो सायन्स आणि तंत्रज्ञान अधिविभागाच्या सभागृहात हा करार झाला.

या सामंजस्य करारात विद्यापीठातील विद्यार्थ्यांचे आदान-प्रदान, संशोधन क्षेत्रात सहकार्य तसेच वित्तीय साहाय्य या बाबींचा समावेश आहे. याप्रसंगी डॉ. पी. एस पाटील यांनी शिवाजी विद्यापीठाबद्दल तसेच विद्यापीठाचा शैक्षणिक संस्थांमधील देशाअंतर्गत अग्रक्रम, मटेरियल सायन्समधील असाधारण झेप आणि यापूर्वी विविध राष्ट्रांबरोबर झालेल्या सामंजस्य करारांबाबतची माहिती दिली.



**कोल्हापूर : कराराप्रसंगी शिवाजी विद्यापीठाच्या वतीने उपस्थित कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि म्यॉंगजी विद्यापीठाच्या वतीने प्रा. जिऑंग गिल सिओ आदी.**

म्यॉंगजी विद्यापीठातील संशोधक डॉ. सिओ यांनी शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी दक्षिण कोरियात उत्तम संशोधकीय योगदान देत असून, या कराराच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठाशी सहकार्यवृद्धी होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला. यावेळी नॅनो सायन्स व तंत्रज्ञान अधिविभाग समन्वयक प्रा. पी. एस पाटील, संख्याशास्त्र अधिविभागाचे ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. डी. टी. शिर्के आंतरराष्ट्रीय संबंध कक्षाचे समन्वयक प्रा. ए. व्ही. घुले आदी उपस्थित होते. डॉ. एस. डी. जगदाळे यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. ए. पी. तिवारी यांनी आभार मानले.

17 MAR 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदवी परीक्षा 'ऑनलाईन' करण्याचा विद्यापीठाचा मानस

## नवीन कायद्यानुसार परीक्षेतील संगणकीकरणाला स्वातंत्र्य

## परीक्षेत गोपनीयता, सुलभता राहणार; पर्यावरणपूरक परीक्षा पद्धत अमलात येणार

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

नवीन विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापीठांतील परीक्षा विभागात तांत्रिक बदल करण्यास स्वातंत्र्य देण्यात आले असून परीक्षा नियंत्रकांचे अधिकारही वाढवले आहेत. शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडविणाऱ्या या धोरणानुसार पारंपरिक परीक्षा पद्धत बंद करून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पदवी व पदव्युत्तरच्या परीक्षा घेण्याचे विशेष अधिकारही बहाल करण्यात आले आहेत. त्यामुळे भविष्यात सर्वच परीक्षा 'ऑनलाईन' पद्धतीने घेण्याचा शिवाजी विद्यापीठाचा मानस आहे. या दृष्टीने १ मार्चपासून 'परीक्षा नियंत्रक' पदाचे नामकरण 'संचालक – परीक्षा व मूल्यमापन मंडळ' असे करण्यात आले आहे.

शिवाजी विद्यापीठातर्फे सध्या अभियांत्रिकी इलेक्ट्रॉनिक टेक्नॉलॉजी व कॉम्प्युटर सायन्स विभागाच्या परीक्षा ऑनलाईन घेतल्या जातात. विद्यापीठाचा हा प्रयोग यशस्वी ठरला आहे. इतर अभ्यासक्रमांच्या प्रश्नपत्रिकांची गोपनीयता ठेवण्यासाठी उर्वरित सर्वच परीक्षांच्या प्रश्नपत्रिका



'एसआरपीडी"च्या माध्यमातून संबंधित परीक्षा केंद्रावर पाठवल्या जातात. सुरुवातीला प्राचार्य संघटनांनी 'एसआरपीडी"बद्दल नाराजी व्यक्त केली; तरीही परीक्षा विभागाने प्रत्येक परीक्षा केंद्राला 'एसआरपीडी"च्या माध्यमातूनच प्रश्नपत्रिका पाठवल्या. अपवाद वगळता सर्वच परीक्षा केंद्रावर 'एसआरपीडी"चा प्रयोग यशस्वी झाला. त्यामुळे प्राचार्य संघटनांनीही परीक्षा नियंत्रकांचे अभिनंदन केले. या पार्श्वभूमीवर भविष्यात विद्यापीठ स्तरावरील पदवी व पदव्युत्तरच्या सर्वच परीक्षा ऑनलाईन करण्याच्या दृष्टीने परीक्षा विभागाच्या हालचाली सुरू आहेत.

### परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालकांना दिलेले अधिकार

- परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालकांनी परीक्षा घेण्याबरोबरच मूल्यमापन करून निकाल जाहीर करणे
- प्रश्नपत्रिका व परीक्षकांची नियुक्ती करणे, परीक्षा किंवा एखादी चाचणी घेऊन त्यांचा निकाल वेळेत लावणे
- परीक्षा व मूल्यमापन मंडळाची मान्यता मिळाल्यावर परीक्षेचे वेळापत्रक जाहीर करणे
- गैरप्रकार घडल्यास किंवा परिस्थितीनुसार परीक्षा पुढे ढकलावी किंवा रद्द करावी
- गैरप्रकाराविरुद्ध शिस्तभंगाची किंवा फौजदारी कारवाई करण्याचा अधिकार
- परीक्षेत गैरप्रकार करणारा परीक्षार्थी, पेपर सेटर, परीक्षक किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीवर कारवाई करण्याचा अधिकार
- परीक्षा झाल्यापासून ३० दिवसांत व जास्तीतजास्त ४५ दिवसांत परीक्षेचा निकाल जाहीर करावा
- परीक्षा व मूल्यमापन मंडळाने घेतलेल्या विद्याविषयक व प्रशासकीय निर्णयाची अंमलबजावणी करावी
- परीक्षा व मूल्यमापन प्रक्रियेसंबंधात विद्यापीठ प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करावी
- परीक्षेत श्रेयांक (ग्रेड) पद्धत अमलात आणावी

१९९४ च्या विद्यापीठ कायद्याला फाटा देत, नवीन कायद्यानुसार विद्यार्थीकेंद्रित पद्धतीने परीक्षा घेतल्या जाणार आहेत. नवीन कायद्यानुसार तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी परीक्षा विभागाला पूर्णपणे स्वातंत्र्य दिल्यामुळे परीक्षाअंतर्गत संपूर्ण उपकरणांचे संगणकीकरण करणे सुलभ होणार आहे.

महाविद्यालयांनी उत्तरपत्रिकांची मागणीदेखील लेखी न करता ऑनलाईन करावयाची आहे. महाविद्यालयाने ऑनलाईन अर्जामध्ये जुन्या उत्तरपत्रिकांचा तपशील, नव्या उत्तरपत्रिकांची संख्या, परीक्षेचा संपूर्ण अहवाल पाठवावयाचा आहे. ही सर्व माहिती महाविद्यालयाच्या 'लॉग इन आयडी'च्या माध्यमातून पाठवायची आहे. भविष्यात परीक्षा विभागाचे सर्वच व्यवहार ऑनलाईन होणार असल्याने, पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्यास हातभार लागणार आहे. कागदविरहित परीक्षा होणार असल्याने याला 'पर्यावरणपूरक परीक्षा' म्हणणे वावगे ठरणार नाही.

### परीक्षेत सुलभता व गोपनीयता शक्य : महेश काकडे



नवीन कायद्यामुळे संगणकीय प्रणाली, तंत्रज्ञानाचा वापर करणे सहज शक्य होणार आहे. परीक्षेतील विविध उपक्रमांमध्ये सुलभता, गोपनीयता व सुरक्षितता राहणार आहे. या व्यतिरिक्त महाविद्यालयांमधून दिल्या जाणाऱ्या शिक्षणातील मुल्यमापण तसेच परीक्षांमधील सीबीसीएस पॅटर्नअंतर्गत होणारे शिक्षण व मूल्यमापन करण्याचे विशेष अधिकार दिल्यामुळे परीक्षा पद्धतीत अडचण येणार नाही..

जनसंपर्क कक्ष
17 MAR 2017 महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'डॉ. विलास संगवे यांचे कार्य दीपस्तंभासारखे'

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'समाजशास्त्र आणि संशोधनातील प्रा. डॉ. विलास संगवे यांचे कार्य हे दीपस्तंभासारखे आहे' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील माजी समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. एन. पवार यांनी केले. शिवाजी विद्यापीठात समाजशास्त्र विभागाच्यावतीने यूजीसी, सॅप डिआरएस फेज-तीन अंतर्गत आयोजित डॉ. विलास संगवे प्रथम स्मृती व्याख्यानमालेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा. डॉ. देवानंद शिंदे होते.

प्रा. डॉ. पवार म्हणाले, 'संगवे हे शिवाजी विद्यापीठाला लाभलेले एक श्रेष्ठ विचारवंत होते. त्यांचे बौद्धिक, शैक्षणिक, संशोधन क्षेत्रातील कार्य हे आंतरराष्ट्रीय पातळीवरचे होते. त्यांच्या संशोधनाला जगनमान्यता मिळालेली होती. जैनधर्माचे तत्वज्ञान त्यांनी जगाच्या पातळीवर नेण्याचे महत्वपूर्ण कार्य केलेले आहे.'



अध्यक्षीय भाषणात कुलगुरु, डॉ. शिंदे म्हणाले, 'संगवे यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान हे वाखाणण्यासारखे होते. अशा ज्ञानतपस्वीच्याकडून सर्वांनी प्रेरणा घेऊन स्वत: कार्यप्रवण झाले पाहिजे.' यावेळी, प्रा. डॉ. निशा मुढे-पवार, प्रा. डॉ. प्रकाष कांबळे, प्रा. डॉ. विजय ककडे, प्रा. डॉ. आर. बी. पाटील, प्रा. डॉ. विजय मारुलकर, डॉ. एस. एन. मोहिते, प्रा. डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. उशा पाटील, डॉ. अर्चना जगतकर, डॉ. अर्जुन जाधव उपस्थित होते. समाजशास्त्र विभागप्रमुख, प्रा. डॉ. जगन कराडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रतिभा देसाई यांनी सूत्रसंचलन केले. डॉ. प्रतिमा पवार यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAR 2017
पुढारी

# विलास संगवे यांचे संशोधन कार्य मार्गदर्शक : प्रा. डॉ. एस. एन. पवार

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** प्रा. डॉ. विलास संगवे यांचे समाजशास्त्र आणि संशोधनातील कार्य हे दीपस्तंभासारखे असल्याचे मत शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. एन. पवार यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित डॉ. विलास संगवे यांच्या प्रथम स्मृती व्याख्यानमालेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे होते. प्रा. डॉ. पवार म्हणाले, 'प्रा. डॉ. संगवे हे शिवाजी विद्यापीठाला लाभलेले एक श्रेष्ठ विचारवंत होते. त्यांच्या संशोधनाला जगन्मान्यता मिळालेली होती. जैनधर्माचे तत्त्वज्ञान त्यांनी जगाच्या पातळीवर नेण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केलेले आहे.' कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'प्रा. डॉ. संगवे यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान हे वाखाणण्यासारखे होते. अशा ज्ञानतपस्वीकडून सर्वांनी प्रेरणा घेऊन स्वत: कार्यप्रवण झाले पाहिजे.' यावेळी प्रा. डॉ. निशा मुढे-पवार, प्रा. डॉ. प्रकाश कांबळे, प्रा. डॉ. विजय ककडे, प्रा. डॉ. आर. बी. पाटील, प्रा. डॉ. विजय मारुलकर, डॉ. एस. एन. मोहिते, प्रा. डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. उषा पाटील, डॉ. अर्चना जगतकर, डॉ. अर्जुन जाधव आदी उपस्थित होते. प्रास्ताविक समाजशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. जगन कराडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रतिभा देसाई यांनी स्वागत केले. आभार डॉ. प्रतिमा पवार यांनी मानले.